# कोव्हिड-१९'चा मानवी जीवनशैली व अर्थव्यवस्थेवर झालेले बदल

**डॉ.विजयकुमार प्रल्हादराव भांजे**
विभाग प्रमुख (इतिहास)
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी,
ता. वाशी जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना:-**

मानवी संस्कृतीच्या इतिहासामध्ये निसर्गाने आपली भूमिका व अस्तित्व नेहमी सजीवांना जाणवून दिले आहे सजीसृष्टीच्या अस्तित्त्वापासूनच निसर्गाने नैसर्गिक आपत्ती व वेगवेगळ्या स्वरूपाचे रोग यांच्या मार्फत निसर्गातील मानवी हस्तक्षेपाला प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो प्रागैतिहासिक कालखंडापासून निसर्गाने सजीव व विशेषत:हा मानवावर आपले नियंत्रण अप्रत्यक्ष पणे प्रस्थापित केलेलं दिसून येते, मानवी इतिहासाचा आढावा घेतला असे दिसून येते की प्रत्येक शतकामध्ये कोणती ना कोणती महामारी ही मानवाला प्रभावित करून गेलेली दिसून येते, यात विशेषत:हा साथीच्या रोगाने मानवी संस्कृती , जीवनशैली व अर्थव्यवस्था यावर मोठया प्रमाणात दुष्परिणाम व विघातक बदल घडवून आणलेले दिसून येतात , या साथीच्या रोगानी मानवी लोकसंख्येंचा होणारा विस्फोट ही नियंत्रित करण्याचे कार्य नैसर्गिक पद्धतीने केलेले दिसून येते.

परंतु 20 व्या व 21व्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे या साथीच्या रोगांवर प्रभावी औषध उपचार शोधले गेल्याने या शतकांच्या पूर्वी जेवढे दुष्परिणाम मानवी जीवनावर होत होते त्याची दाहकता कमी झाल्याचे दिसून येते,आधुनिक कालखंडात मानवी जीवन हे अर्थव्यस्था व पैसा याच्याशी केंद्रीत झाल्याचे दिसून येते.सर्व मानव जातीच्या जीवनाचे व जगण्याचे साधन म्हणून पैसा व संपत्तीयाला सर्वाधिक मूल्य प्राप्त झालेले आहे त्यामुळे मानवी जीवन हे अर्थव्यवस्थेच्या भोवताली फिरताना दिसून येते, परंतु या अर्थव्यवस्थेच्या हव्यासापोटीच मानवाने निसर्गाचे अतोनात नुकसान केले. औद्योगिक क्रांती, विज्ञान व त्यातून निर्माण झालेले तंत्रज्ञान यातून त्याचा विनियोग योग्य पद्धतीने न लावल्याने वायू, ध्वनी, जल प्रदूषणाच्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या , निसर्गाचा समतोल बिघडल्याने वेगवेगळ्या प्रकारचे साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला, व त्याचा प्रभाव हा मानवनिर्मित अर्थव्यवस्थेवर व जीवनशैली वर पडून मानवाला याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.

२०१९ मध्ये चीनमधून फैलाव झालेला कोविड (कोरोना) चा विषाणू जगभर पसरला व आज २ वर्षे होत आली तरी तो आटोक्यात येताना दिसत नाही,तो ठराविक कालावधी व प्रदेशानुसार आपल्या प्रारूपामध्ये बदल घडवून आणत असल्याचे दिसून येत आहे. या विषाणू ने ज्या- ज्या वेळेस आपल्या प्रारूपात बदल घडवून आणला त्या- त्या वेळेस तो अधिक प्रभावी व मानवास घातक होत असल्याचे दिसून येत आहे. या विषाणू ने जागतिक व भारतीय यांची जीवनशैली व अर्थव्यवस्था पुर्णपणे बदलून टाकलेली दिसून येते

➢ **संशोधन विषयाचे महत्त्व:-**

जगाच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या स्वरुपाच्या रोगराईचा प्रभाव दिसून येतो, परंतु कोविड १९ याने सर्व जग व्यापून टाकले आहे, जागतिक

आरोग्य संघटनेने याला जागतिक महामारी म्हणून घोषित केले आहे, या रोगराई मुळे मानवी जीवन जगण्याच्या पद्धती आमुलाग्र बदल झालेले दिसून येत आहेत, मानवाने स्वत:ला या कालावधीत बदलून घेतले आहे मानवाच्या राहण्याची, खाण्याची, कामकाज, असा एक नव्हे सर्व बाबतींत आमुलाग्र बदल करून घेतले आहेत, व याचा अर्थव्यवथेवर काय परिणाम होत आहेत याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे :-**

कोणतेही सामाजिक संशोधन हे निश्चित उद्धीष्टांवर अवलंबून असते. सुनिश्चित उद्धीष्टांमुळे आपणास नवनवे अभ्यासाचे विषय काळजीपूर्वक अभ्यासात येतात.कोणत्याही शास्त्रीय संशोधनामध्ये सुस्पष्ट उद्दिष्टे सुनिश्चित करावी लागतात. सदर संशोधनाची दिशा स्पष्ट करताना पुढील उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.

१) कोविड १९ ही जागतिक महामारी आहे.
२) कोविड १९ पूर्वीच्या साथीच्या रोगापेक्षा अधिक विघातक आहे.
३) कोविड १९ मुळे मानव निसर्गा पुढे हतबल आहे हे सिद्ध झाले.
४) कोविड १९ मुळे मानवी जीवन शैली आमुलाग्र बदल घडून आले.
५) कोविड १९ मुळे जागतिक व भारतीय अर्थव्यवथेमध्ये मोठे बदल झालेले दिसून येतात.

- **कोव्हिड-१९'चा मानवी जीवनशैली व अर्थव्यवस्थेत झालेले बदल:-**

विषाणूचा प्रसार होत असल्याने राज्य सरकारांनी मुक्त संचारावर लावलेल्या निर्बंधांमुळे सर्वात मोठा परिणाम सेवा क्षेत्रावर झालालोकांना कामाच्या ठिकाणी सार्वजनिक वाहनांमुळे जाता येत यातच भारतातील .नसल्याने बेरोजगारीत वृद्धी झाली बहुसंख्य रोजगार असंघटित क्षेत्रातील असल्याने, कामाच्या अभावाने लाखो स्थलांतरीत मजुरांना त्यांच्या मूळ गावी परतावे लागले, पर्यटन रिटेल आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रावरही नकारात्मक परिणाम झाला चांगली बाब म्हणजे तद् नंतर आलेल्या अनलॉकमध्ये ही स्थिती बदलली असून या क्षेत्रांत पुन्हा एकदा मागणीत चांगलीच वाढ होत आहेत.

कोरोनामुळे झालेला आणखी एक बदल म्हणजे अनेक कंपन्यांना त्यांच्या कामकाजात मोठा बदल करावा लागलाकोरोनाच्या उद्रेकामुळे सोशल . डिस्टन्सिंगच्या नियमाने'वर्क फ्रॉम होम' आणि 'वर्क फ्रॉम एनिव्हेअर'चा प्रसार झाला लोकांना प्रत्यक्ष येवून कामाची नोंदणी करावी लागत कोविडपूर्वीही गोष्ट विचाराधीनच नव्हती .ही स्थिती संस्था आणि कर्मचाऱ्यांसाठी ही फायद्याची ठरली कारण कंपन्यांचा खर्च कमी झाला व कर्मचाऱ्यांचा प्रवासातील वेळ वाचला कर्मचारी बहुतांश वेळ घरीच राहत असल्याने संबधित खर्च कमी झालातर दुसरीकडे कंपन्यांना रियल इस्टेटव इतर सेवांचा खर्च कमी करता आला

आरोग्य क्षेत्रातील स्थितीही अशीच आहे . कंपन्यांची विक्री मोठ्या प्रमाणात झाल्यो आरोग्य व फार्मा क्षेत्रातील शेअर्सच्या किंमतीत मोठी वाढ दिसून आलीसध्याच्या स्थितीमुळे ग्राहक मोबाइल ॲपच्या . माध्यमातून उपचारांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेत असल्याने फार्मा आणि हेल्थ टेक कंपन्याही डिजिटल विषाणूच्या .क्षेत्रातील संधी पडताळून पाहत आहेत प्रसारापूर्वीही या क्षेत्रात संबंधित दिशेने प्रगती सुरू होती . कोव्हिड १९ मुळे ही वृद्धी वेगाने झाली- .या घटनांचा परिणाम म्हणून, इतर स्टेकहोल्डर्सपैकी हेल्थ व वेलबिइंग क्षेत्रावर जास्त लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येते.

कोव्हिडचा उद्रेक झाल्याने - सरकारे आणि मध्यवर्ती बँकांनी जागतिक मंदीच्या काळापेक्षाही मोठ्या प्रमाणात प्रोत्साहनपर आर्थिक पॅकेज जाहीर केले . व्याजदर करण्यात आले व अर्थव्यवस्थांमध्ये तर एफआयआयचा प्रवाह वाढला त्यामुळे .जवळपास शून्य

जागतिक तरलतेत वाढ झाली व भारतासह नवोदित भारतात २०२ .बाजारपेठेत१ या वित्तवर्षासाठी २ लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक झाली .

बेंचमार्क निर्देशांक सर्वोच्च स्थानावर व्यापार करताना दिसत असल्यामुळे स्टॉक मार्केटमध्येही मजबूत बूलरन दिसली बाजारात प्रवेश करण्याकरिता खूप कमी मूल्य प्रदान करावे लागत असल्यामुळे गुंतवणुकदारांनी या संधीचा लाभ घेतला परिणामी . बाजारात रिटेल भागीदारांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले

अखेरीस, या साथीने आपल्याला आर्थिक शहाणपणाचे धडे शिकवले .

तुम्ही नियमित गुंतवणूक आणि लिक्विट फंडांद्वारे आर्थिक नियोजन केल्यास, अशा प्रकारच्या संकटात तुम्हाला नक्कीच मदत होते .

कठीण परिस्थितीवर आपण कशी मात करायची हे यातून शिकता येते, पण त्यासोबतच, बाजारातील संधी कशी साधायची हेसुद्धा कळत सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हा उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत असून महागाईवर याद्वारे मात करता येते.

आपल्या उत्पन्नाच्या प्राथमिक स्रोतापासून ते दुय्यमस्त्रोतापर्यंत नेहमीच एक आपत्कालीन योजना असावी लागतेतसे .लॉकडाऊनदरम्यान, तरलतेच्या अभावामुळे कुटुंबांना प्रचंड त्रास झालाअशा स्थितीत . संकट काळावर मात करण्यासाठी तरलतेची गरज असते आणि ती केवळ पर्यायी उत्पन्नाच्या स्रोताद्वारेच मिळवता येते .

**संदर्भ:-**

१) https://en.wikipedia.org
२) महाराष्ट्र टाइम्स.
३) अच्युत गोडबोले, सूक्ष्मजंतू, संकेत प्रकाशन.
४) डॉ. राजेश पारिख, दि कोरोना वायरस, संगणक प्रकाशन.
५) https://www.who.int
६) https://covid.giveindia.org
७) www.business.qld.gov.au